# राष्ट्रीय कोशिका विज्ञान केन्द्र, पुणे

## National Centre for Cell Science, Pune

**भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागांतर्गत स्वायत्त संस्था**

**एनसीसीएस कॉम्प्लेक्स, एस. पी. पुणे विद्यापीठ परीसर, गणेशखिंड, पुणे– 411 007 .**

**दूरध्वनी क्र. 020-25708000**

---

**एनसीसीएस/ जाहिरात/ शैक्षिक कक्ष/ जेआरएफ-पीएचडी/ऑगस्ट-2022** **दिनांक: 14.03.2022**

## <u>एनसीसीएस पीएच.डी प्रवेश- ऑगस्ट,2022</u>

एनसीसीएस, पुणे **ऑगस्ट-2022** च्या पीएच.डी कार्यक्रमासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवत आहे. पीएच.डी. पदवी प्राप्त करण्यासाठी आधुनिक जीवशास्त्रात संशोधन करण्याची दृढ प्रेरणा असलेल्या आणि सातत्याने चांगली शैक्षणिक नोंद असलेल्या उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पात्रतेसह त्यासाठी अर्ज करावा. **पदव्युत्तर पदवी असलेले आणि सीएसआयआर / यूजीसी / डीबीटी (श्रेणी I) / आयसीएमआर / बीआयएनसीकडून वैध फेलोशिप असलेले सर्व विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत.**

**पदव्युत्तर पदवीधर विदयार्थी पण ज्यांच्याकडे फेलोशिप नाही आहे परंतु जे डिसेंबर, 2021 रोजी एनसीबीएस/ टीआयएफआर मार्फत घेण्यात आलेल्या जेजीईईबीआयएलएस परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत असे सर्व विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत. तथापि, एनसीसीएसच्या निकषांनुसार शॉर्टलिस्टेड उमेदवारांनाच केवळ मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल.** ज्यांना फेलोशिप नाही (सीएसआयआर / डीबीटी / आयसीएमआर / यूजीसी / डीएसटी-इंस्पायर / बीआयएनसी कडून) परंतु जेजीईईबीआयएलएस पात्र आहेत आणि ज्यांची निवड एनसीसीएसने केली आहे अशा विद्यार्थ्यांना मर्यादित संख्येने फेलोशिप दिली जाईल . **एनसीसीएस-पीएचडी कार्यक्रमासाठी अर्ज सादर करणे हया गोष्टीची आपोआप हमी देत नाही की मुलाखतीसाठी उमेदवाराला शॉर्टलिस्ट केले जाईल.**

एनसीसीएस निकष पूर्ण करणा-या शॉर्टलिस्टेड उमेदवारांना एनसीसीएस येथे **<u>20, 21 आणि 22 जून 2022</u>** दरम्यान घेण्यात येणार असलेल्या ऑनलाइन मुलाखतीसाठी उपस्थित रहावे लागेल. तपशीलवार पात्रता अटी खाली दिल्या आहेत.

**<u>एनसीसीएस पीएच. डी कार्यक्रमासाठी पात्रता-:</u>**

1. आधुनिक जीवशास्त्रातील संशोधनात रस असणाऱ्या विज्ञानातील कोणत्याही शाखेत पदव्युत्तर (पदव्युत्तर) पदवी असणे आवश्यक आहे, तसेच कमीतकमी 55% किंवा समकक्ष ग्रेड पॉईंट एव्हरेज (जीपीए) असणारे (एससी/ एसटी/ ओबीसी आणि दिव्यांग व्यक्तींसाठी 5% गुणांची शिथील केले जातील) आणि **सीएसआयआर / यूजीसी / डीबीटी / आयसीएमआर / बीआयएनसी /**

**डीएसटी-इन्स्पायर वैध फेलोशिप असलेले सर्व विद्यार्थी किंवा नेट-एलएस (NET-LS ) किंवा गेट (GATE) असलेले डीएसटी-इंस्पायर पात्र विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत.**

2. ज्या उमेदवारांकडे फेलोशिप आहे आणि त्यांनी जुलै-2022 च्या अखेरीस त्यांची पदव्युत्तर पदवी पूर्ण करणे अपेक्षित आहे ते देखील अर्ज करण्यास पात्र आहेत. त्यांची निवड तात्पुरती असेल आणि नोव्हेंबर 2022 च्या अखेरीस पात्रता निकष पूर्ण करण्याच्या अधीन असेल.
3. पदव्युत्तर पदवीधर विदयार्थी पण ज्यांच्याकडे फेलोशिप नाही आहे परंतु जे डिसेंबर, 2021 रोजी एनसीबीएस/ टीआयएफआर मार्फत घेण्यात आलेल्या जेजीईईबीआयएलएस परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत असे सर्व विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत. जेजीईईबीएलएस निकालांच्या आधारे एनसीसीएस निकषांनुसार विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी शॉर्टलिस्ट केले जाईल. ह्या संदर्भात एनसीसीएस चा निर्णय अंतिम राहील. कृपया आपला **जेजीईईबीआयएलएस डिसेंबर, 2021 चा संदर्भ कोड** नमूद केलेल्या जागी निर्दिष्ट करा.
4. जे उमेदवारांनी केवळ सीएसआयआर-यूजीसी (नेट) व्याख्यानमालेसाठी पात्र ठरलेले आहेत आणि “आयसीएमआरच्या प्रकल्प यादी” मध्ये आहेत ते उमेदवार पात्र नाहीत.

**सूचना :**

I. एनसीसीएस चा पीएच.डी कार्यक्रम हा पूर्ण वेळ कार्यक्रम आहे. निवड झालेल्या उमेदवारांना परीसरांत रहावे लागेल.

II. शेवटच्या तारखेच्या आत प्राप्त सर्व पात्र पूर्ण अर्जांची तपासणी केली जाईल आणि वेळापत्रकानुसार शॉर्टलिस्टेड उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल.

III. फेलोशिपच्या इतर नियम व अटी फेलोशिप देणाऱ्या फंडिंग एजन्सीद्वारे निर्देशित केल्या जातील. जेआरएफसाठी उच्च वयोमर्यादा 28 वर्षे असेल जी एससी/ एसटी/ महिला / पीडब्ल्यूडी मधील उमेदवारांच्या बाबतीत 5 वर्षांपर्यंत शिथील केली जाईल तर ओबीसी उमेदवारांच्या बाबतीत 3 वर्षांपर्यंत शिथील केली जाईल किंवा जसे लागू आहे त्याप्रमाणे.

IV. डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर तत्त्वावर संबंधित फंडिंग एजन्सीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार फेलोशिप कार्यान्वित केली जाईल. एनसीसीएस फेलोशिप प्रदान करण्यास जबाबदार नाही.

V. आरक्षण भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार असेल.

**VI. एससी / एसटी / ओबीसी उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र / नवीनतम नॉन-क्रीमी लेयर प्रमाणपत्राची सत्य प्रत संलग्न करावी आणि कार्यग्रहण करतेवेळी ह्या प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती सादर कराव्यात.**

VII. ईमेल च्या विषयामध्ये कृपया <u>**पीएच.डी- ऑगस्ट 2022 सत्रासाठी अर्ज**</u> असे नमूद करावे.

VIII. संपूर्ण अर्ज (एनसीसीएस वेबसाइटवरून डाउनलोड करा) व पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री मार्कस स्टेटमेंट आणि फेलोशिप प्रमाणपत्र / प्रवेश पत्र च्या प्रतींसह 20 मे 2022 रोजी किंवा त्यापूर्वी ई-मेलद्वारे phdadmission@nccs.res.in वर पाठवावे (प्रमाणपत्रांसह विहित नमुन्यात असलेली एक पीडीएफ फाइल).

**IX.** काही प्रश्न असल्यास उमेदवाराने **phdadmission@nccs.res.in** वर ईमेल करावेत. फोनवर कोणत्याही शंकांचे निरसन केले जाणार नाही.

<u>**मुलाखत:-**</u>
एनसीसीएसने निश्चित केलेल्या निवड मापदंडानुसार सर्व शॉर्टलिस्टेड उमेदवारांच्या एनसीसीएस, पुणे येथे ऑनलाईन मुलाखती घेण्यात येणार आहे. मुलाखत प्रक्रियेचा तपशील एनसीसीएस वेबसाइटवर शॉर्टलिस्टेड उमेदवारांच्या यादीसह <u>**7 जून 2022**</u> रोजी प्रकाशित केला जाईल.

## <u>ऑगस्ट-2022 पीएच.डी प्रवेश कार्यक्रम</u>

| | | |
|---|---|---|
| 1 | सर्व आवश्यक कागदपत्रांसहीत एनसीसीएस मध्ये अर्ज करण्याची शेवटची तारीख | **20 मे, 2022** |
| 2. | एनसीसीएसमध्ये मुलाखतीसाठी बोलविण्यांत येणा-या शॉर्टलिस्टेड उमेदवारांची यादी प्रकाशन | **7 जून, 2022** |
| 3. | मुलाखतीच्या तारखा आणि वेळ | <u>**20, 21 आणि 22 जून, 2022 रोजी सकाळी 9.00 वाजल्यापासून**</u> |
| 4. | मुलाखतीचे परिणाम घोषित करण्याची तिथी | **23 जून, 2022** |
| 5. | मार्गदर्शक निवड फॉर्म प्रस्तुत करणे | **30 जून, 2022 च्या आधी** |
| 6. | एनसीसीएस मध्ये कार्यग्रहण करण्याची अपेक्षित तारीख | **1 ऑगस्ट, 2022** |

निवड झालेल्या उमेदवारांना पीएच.डी प्रवेशासाठई एसपीपीयु, पुणे च्या निकषांची पूर्तता करावी लागेल http://intranet.nccs.res.in/assets/downloads/3-PhDRulesJan2017.pdf

**डीन**

**शैक्षिक कक्ष**